दैनिक दिव्य मराठी
# दिव्य सिटी
बुलडाणा. शुक्रवार, २३ ऑगस्ट २०१३

# महाविद्यालयाने एकाच दिवसात वाचवले लाखाचे पेट्रोल

**आगळेवेगळे** वाहनांमुळे होणारे प्रदूषण टाळण्यासाठी पाळला 'नो व्हेइकल डे', दर गुरुवारी उपक्रम राबवणार, शिक्षकांसह विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी | चिखली

वाहनांच्या प्रदूषणामळे पर्यावरणास होणारा मोठा धोका पाहता येथील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी 'नो व्हेइकल डे' पाळण्याचा निर्धार केला आहे. गुरुवारी (दि. २२) पहिला 'नो व्हेइकल डे' पाळून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिलाच शिवाय लाखोच्या पेट्रोलची ही बचत केली.

स्वातंत्र्यदिनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निळकंठ भुसारी यांनी त्यांची ही कल्पना महाविद्यालयातील प्राध्यापक व सहकाऱ्यांना बोलून दाखवली होती. तसा संकल्पही त्यावेळी करण्यात आला. त्याची अंमलबजावणी गुरुवारी त्यांनी केली. पहिल्याच प्रयत्नात या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्राध्यापकांसह विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात सहभाग घेतल्याने एकाच दिवसात जवळपास एक लाख रुपयांचे इंधन वाचवण्यात आले आहे.

गुरुवारी एकाही शिक्षक, विद्यार्थी वा कर्मचाऱ्याने वाहनाने महाविद्यालयाच्या आवारात प्रवेश केला नाही. 'नो व्हेइकल डे'च्या निमित्ताने महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर तसे बॅनर लावून उद्‌बोधनही करण्यात आले. सर्व विद्यार्थी, प्राध्यापकांनी सायकलने वा पायीच महाविद्यालयात येणे पसंत केले.

प्राचार्य डॉ. निळकंठ भुसारी, प्राध्यापक टी. डी. गोरे, प्रा. डी. आर. सावळे, प्रा. पी.जी. सवडतकर, व्ही. डी. सावळे, गजानन सुसर यांनी महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर 'नो व्हेइकल डे'चे बॅनर लावून पर्यावरण रक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

## अशी झाली बचत

| | |
|---|---|
| १०१ महाविद्यालयीन कर्मचारी संख्या | २२०० महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या |
| १३२६ महाविद्यालयातील वाहनांची संख्या | |
| १३०१ लिटर प्रतिदिन दुचाकी वाहनांना लागणारे इंधन | ९९०७५ रुपये खर्च प्रतिदिन लागणाऱ्या इंधनावर |

## इंधन वाचवा, पृथ्वी वाचवा विद्यार्थ्यांचा नारा




## आर्थिक बचतीसोबत आरोग्यदायी उपक्रम

"या उपक्रमाच्या माध्यमातून इंधनाची बचत होण्यासोबतच प्रदूषण टाळण्यास मदत होतेय. सोबतच स्वतःच्या आरोग्यासाठीही ते उपयुक्त आहे. ग्लोबल वॉर्मिंगचे धोके लक्षात घेता, आठवड्यातून एक दिवस का होईना, सर्वांनीच ना-वाहन दिवस अवश्य पाळला पाहिजे."

**डॉ. निळकंठ भुसारी**, प्राचार्य
शिवाजी महाविद्यालय, चिखली